वर्ष : ०४ | अंक: ५ | मुंबई, मंगळवार २६ डिसेंबर २०१७ ते १ जानेवारी २०१८ | पृष्ठ: ४

मूल्य २/- रुपये

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

POSTAL REGISTRATION NO. THW/205/2016-2018

# पोलीस बातमी पत्र


संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक

PG 2 २०११ पर्यंतच्या झोपड्यांना संरक्षण

3 → जुन्या ठाण्याचा पुनर्विकास अडचणीत

मेट्रोसाठी ६२ हजार ९४३ कोटी, १५७ किलोमीटरचे मेट्रोचे जाळे ← 4

## भारतीय नागरिक कुलभूषण जाधव यांची आई व पत्नीशी भेट



### कुलभूषण आणि आई-पत्नीच्या भेटीत का होती काचेची भिंत?

**इस्लामाबाद: पाकिस्तानात हेरगिरीच्या आरोपाखाली कैद असलेले भारतीय नौदलाचे माजी अधिकारी कुलभूषण जाधव यांनी सोमवार (दि. २५) त्यांची आई आणि पत्नीची भेट घेतली. तब्बल दीड वर्षानंतर त्यांची कुटुंबीयांसोबत भेट झाली. ४० मिनिटांच्या या भेटीनंतर कुलभूषण जाधव यांची आई व पत्नी लगेचच व्यावसायिक विमानाने भारताकडे रवाना झाले.**

**भेटीसाठी खास काचेची रूम -**

पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या कार्यालयात या भेटीसाठी खास काचेच्या भिंतींची इंटरकॉम रुम तयार करण्यात आली होती. काचेच्या एका बाजूला कुलभूषण जाधव बसले होते तर दुसऱ्या बाजूला त्यांची आई आणि पत्नी बसली होती. ते एकमेकांना दिसत होते पण काही अंतरावर असूनही त्यांना एकमेकांना मायेचा स्पर्श करता आला नाही. त्यामुळे थेट संवाद न होता इंटरकॉमच्या माध्यमातूनच त्यांच्यात बोलणं झालं. तब्बल दीड वर्षानंतर झालेल्या या भेटीदरम्यान काचेची भिंत असल्याचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आणि त्यावरून पाकिस्तानवर टीका होत आहे.

**का होती काचेची भिंत -**

या भेटीनंतर पाकिस्तानच्या परराष्ट्रमंत्रालयाने पत्रकार परिषद घेतली असता त्यांना याबाबत प्रश्न विचारण्यात आला. या भेटी दरम्यान काचेची भिंत का होती असा प्रश्न पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ता मोहम्मद फैसल यांना विचारण्यात आला. त्यावर सुरक्षेच्या दृष्टीकोनातून काचेची भिंत ठेवण्यात आली होती असं ते म्हणाले. कुलभूषण जाधवची भेट घेता येईल पण भेटीदरम्यान सुरक्षेची काळजी घेतली जाईल असं आम्ही भारताला यापूर्वीच कळवलं होतं असं स्पष्टीकरण मोहम्मद फैसल यांनी दिलं आहे.

**मी पाकिस्तान सरकारचा आभारी- जाधव**

या भेटीनंतर पाकिस्तानच्या परराष्ट्रमंत्रालयाने पत्रकार परिषद घेऊन भेटीनंतरचा एक व्हिडीओ जारी केला आहे. या व्हिडीओत कुलभूषण जाधव यांनी पाकिस्तान सरकारचे आभार मानले आहेत. आई आणि पत्नीला भेटू द्यावं अशी विनंती मी पाकिस्तानच्या सरकारकडे केली होती. माझी विनंती मान्य केल्याबद्दल मी पाकिस्तान सरकारचे आभार मानतो असं या व्हिडीओत कुलभूषण जाधव म्हणताना दिसत आहेत. सीएनएन न्यूज १८ ने कुलभूषण जाधव यांचा हा व्हिडीओ शेअर केला आहे.

**दहा मिनीटं भेट वाढवली -**

३० मिनिटांची भेट ठरली होती, पण भेट संपायला आली असताना कुलभूषण आणि त्याच्या आई-पत्नीने थोडा वेळ आणखी देण्याची विनंती केली. त्यावर त्यांची विनंती मान्य करत दहा मिनीटं वेळ वाढवण्यात आली अशीही माहिती पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्रालयाने दिली.

**ही शेवटची भेट नाही -**

कुलभूषण जाधव यांची त्यांच्या नातेवाईकांसोबतची ही शेवटची भेट म्हणावी का असा प्रश्न पत्रकारांनी विचारला असता, या भेटीला शेवटची भेट म्हणता येणार नाही, ही पूर्णपणे केवळ मानवतेच्या दृष्टीने झालेली भेट होती. असं सूचक वक्तव्य पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्रालयाकडून करण्यात आलं आहे.

## जवानांची बलिदाने 'चुनावी जुमले' ठरू नयेत




### सेनेचा मोदींना टोला

**मुंबई - भाजप व केंद्र सरकारवर टीकेची एकही संधी न सोडणाऱ्या शिवसेनेने पुन्हा एकदा मोदी सरकारवर निशाणा साधला आहे. काश्मीरमध्ये पाकिस्तानच्या गोळीबारात मेजर प्रफुल्ल मोहरकर यांच्यासह तीन जवान हुतात्मा झाले. हाच मुद्दा पुढे करत सेनेने केंद्र सरकारला फटकारले आहे. गुजरात विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पाकिस्तानच्या मदतीने सत्तांतर करत असल्याचा दावा करत भाजपने निवडणुकीत हा मुद्दा तापवला होता. आता निवडणूक झाली पाकच्या हस्तक्षेपाचे काय झाले, की हा 'चुनावी जुमला' होता असा सवाल त्यांनी उपस्थित केला. काश्मीरात पाकिस्तानच्या गोळीबारात वाढ झाली आहे. आपले जवान तिथे हुतात्मा होत आहेत. पण देशाची संरक्षण यंत्रणा सत्तेचे इमले व निवडणुकांचे जुमले यातच गुरफटलेली आहे, अशावेळी देशाला वाचवायचे कोणी, असा सवाल करत जवानांची बलिदाने हे जुमले ठरू नयेत, अशी अपेक्षा व्यक्त केली.**

सीमेवर पाकिस्तानने उच्छाद सुरू केला आहे. पाकिस्तानच्या गोळीबारात तीन जवान हुतात्मा झाले. आमच्या तीन जवानांच्या बदल्यात पाकिस्तानची किती मुंडकी उडवली, असा सवाल पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी 'सामना' या सेनेच्या मुखपत्रातून उपस्थित केला.

सर्वाधिक रक्त भारताच्या भूमीत सांडत आहे. अशावेळी ठोस कृती करून आणि त्याहीपेक्षा पाकिस्तानला धडा शिकवण्याची गरज आहे. सीतारमण या करारी संरक्षण मंत्री असतीलही किंवा महिला संरक्षण मंत्री नेमल्याने पाक, चीन, नेपाळ, बांगलादेशसारख्या राष्ट्रांनी अचंबित होऊन तोंडात बोटेही घातली असतील, पण त्यांची बोटे तोंडात असली तरी दुसऱ्या हाताची बोटे बंदुकांचे खटके रोज दाबीत आहेत. आम्ही मात्र स्वतःच्याच विजयात दंग आहोत. गुजरातच्या निवडणुकीत पंतप्रधानांनी पाकिस्तानवर हल्लाबोल केला. पाकिस्तानच्या नावाने गुजरातच्या प्रचारसभा दणाणून सोडल्या. पण आता कृती करण्याची वेळ आलीय, असा सल्ला सेनेने दिला.



## मुंबईकरांचा प्रवास गारेगार, एसी लोकल धावली

**मुंबई:** एसी लोकल येणार येणार म्हणून अनेक वर्षापासून वाट पाहणाऱ्या मुंबईकरांची प्रतिक्षा अखेर संपली आहे. नाताळ निमित्त बोरिवली ते चर्चगेट दरम्यान धावणाऱ्या देशातील पहिल्या एसी लोकलला हिरवा झेंडा दाखविण्यात आला. त्यामुळे रोज लोकलच्या गर्दीतून घामाघूम होत प्रवास करणाऱ्या प्रवाशांना गारेगार प्रवासाचा आनंद लुटता आला.

सोमवारी सकाळी १०.३० वाजता राज्याचे शालेय शिक्षण मंत्री विनोद तावडे यांनी बोरिवली स्थानकात एसी लोकलला हिरवा झेंडा दाखवला. यावेळी खासदार किरीट सोमय्या, भाजपचे मुंबई अध्यक्ष आशिष शेलार, आमदार मनिषा चौधरी आणि माजी मंत्री भाई गिरकर आदी मान्यवर उपस्थित होते. त्यानंतर ही एसी लोकल चर्चगेटपर्यंत धावली. २५ ते २९ डिसेंबरदरम्यान एसी लोकलच्या फेऱ्या प्रायोगिक तत्वावर करण्यात येणार आहेत. तर १ जानेवारीपासून १२ फेऱ्या दररोज चालवल्या जातील. यातील ८ फेऱ्या फास्ट, ३ सेमी फास्ट तर १ फेरी स्लो असणार आहे. तर देखभालीच्या कामासाठी शनिवार आणि रविवार या दोन दिवशी लोकलला सुट्टी असेल. या एसी लोकलचं पहिल्या सहा महिन्यांसाठी किमान तिकीट ६० रुपये असून, कमाल भाडं २०५ रुपये राहणार आहे. यात जीएसटीचाही समावेश असेल.






## मागण्या मान्य न झाल्यास प्राण सोडणार

***संभल - ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे येत्या मार्चमध्ये दिल्लीत आंदोलन करणार आहेत. 'हे आपलं शेवटचं आंदोलन असेल. या आंदोलनातील मागण्या सरकारने मान्य केल्या नाही तर प्राणाची आहुती देईन,' असा इशारा अण्णा हजारे यांनी दिला आहे.***

अण्णा हजारे रविवारी उत्तर प्रदेशातील संभल येथे आले होते. यावेळी भारतीय किसान युनियनच्या शेतकरी मेळाव्याला संबोधित करताना त्यांनी हा इशारा दिला. 'सरकारनं आमचं म्हणणं ऐकावं म्हणून आंदोलन करण्यात येईल. पण सरकारनं आमचं ऐकलं नाही तर मी जागेवरच प्राण सोडेन, असं त्यांनी सांगितलं.

येत्या २३ मार्च रोजी दिल्लीत होणाऱ्या आंदोलनात मोठ्या प्रमाणावर सहभागी होण्याचे आव्हान करतानाच तुरुंगात जाण्याची तयारी असेल तर दिल्लीत होणाऱ्या आंदोलनात सहभागी व्हा, अशी हाकही त्यांनी दिली. देशाला स्वातंत्र्या मिळून ७० वर्ष उलटली तरी परिस्थिती जैसे थेच आहे. गोऱ्यांनी देश सोडल्यानंतर आता काळ्या लोकांनी राज्य सुरू केलं आहे, अशी टीकाही त्यांनी यावेळी केली.



## सौजन्य व्हॉट्सअप




## नववर्ष स्वागतासाठी मद्यबाजाराला झळाळी




नववर्षाच्या स्वागतासाठी मद्यबाजार सज्ज झाला आहे. लिची मार्टिनी, ग्रीन ॲपल मार्टिनी, फ्लेवर्ड मार्गरिटा, पिनाकोलाडा या कॉकटेल मद्यपेयांसोबत, व्होडका, व्हाईट रम, डार्क रम, कोनियाक ब्रँडी या परदेशी मद्यप्रकारांना सर्वाधिक मागणी असल्याचे मद्यविक्रेत्यांचे म्हणणे आहे. उच्च आथक गटामध्ये यंदा महागड्या शॅम्पेनला सर्वात मागणी असल्याचे निरीक्षण नोंदविले जात आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाला मद्यापासून मिळणाऱ्या उत्पन्नात ७ टक्क्यांनी वाढ झाली असून, एकूणच मद्य रिचविण्याचे प्रमाण वाढल्याचे चित्र आहे.



# २०११ पर्यंतच्या झोपड्यांना संरक्षण
## राजकीय फायदा, पण बकालपणा वाढणार

**मुंबई : मुंबईसह राज्यातील २०११पर्यंतच्या झोपड्यांना संरक्षण देत त्यांच्या पुनर्विकासाचा मार्ग मोकळा करण्यात आला आहे. यासंबंधीच्या विधेयकाला विधानसभेने मंजुरी दिली. 'सर्वांसाठी घरे' या संकल्पाची अंमलबजावणी होईल, असा विश्वासही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर व्यक्त केला आहे. याच विधेयकाच्या मंजुरीनंतर मुंबई शहर आणि उपनगराला पडलेल्या झोपड्यांचा विळखा सुटेल, झोपड्यांचा पुनर्विकास होईल, झोपडीधारकांना त्यांच्या हक्काची घरे मिळतील...? अशा अनेक प्रश्नांचा गुंता निकाली निघणार आहे. मात्र यासाठी मोठी प्रक्रिया असून, तोवर झोपड्यांमध्येही भरच पडणार आहे.**



झोपड्यांना पाणी आणि वीज या प्राथमिक सेवा-सुविधा पुरविण्याचे काम प्रशासनाचे आहे. मात्र आजही झोपडीधारकांना पुरेशी वीज आणि पाणी मिळत नाही. परिणामी २०११पर्यंतच्या झोपड्यांना संरक्षण देत त्यांच्या पुनर्विकासाबाबतच्या विधेयकाला विधानसभेत मंजुरी मिळाल्यानंतर 'लोकमत'ने सर्वसमावेशक क्षेत्रांतील तज्ज्ञांसह झोपडीधारकांसाठी काम करत असलेल्या नागरिकांच्या प्रतिक्रिया जाणून घेतल्या असून, याद्वारे संबंधितांनी प्रशासनाच्या अनागोंदी आणि धिम्या गतीने सुरू असलेल्या कारभारावर बोट ठेवले आहे. दरम्यान, यासंदर्भातील निर्णय हे राजकीय हेतूने प्रेरित होत घेतले जात असून, याचा फायदा राज्यकर्त्यांनाच होणार आहे, असाही सूर उमटू लागला असून, झोपड्या वाढल्या तर बकालपणाही वाढणार आहे.

मुंबईमध्ये किती एसआरए प्रकल्प आहेत, त्यापैकी किती प्रकल्प कार्यरत आहेत, याचा शासनाने सर्व्हे करावा. आधी १९९५ पर्यंतच्या झोपडपट्ट्यांना संरक्षण दिले. मग २००० च्या आणि त्यानंतर तब्बल २०११ पर्यंतच्या झोपडपट्ट्यांना संरक्षण देण्यात आले आहे. हे कुठे तरी थांबणे आवश्यक आहे.

# मोदी सरकार आता कंडोमसाठीही आधार कार्ड मागेल

**मुंबई-** आधार कार्डच्या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार नागरिकांच्या खासगी आयुष्यात ढवळाढवळ करत असून हे सरकार उद्या कंडोम आणि चित्रपटाचे तिकीट विकत घेतानाही आधार कार्ड मागेल, अशा शब्दांत माजी केंद्रीय अर्थमंत्री पी. चिदंबरम यांनी आधारसक्तीची खिल्ली उडवली.

चिदंबरम यांनी आयआयटी मुंबईच्या 'मूड इंडिगो' या महोत्सवात 'आर्थिक क्रांती' या चर्चासत्रात नोटाबंदी, वस्तू सेवा कर (जीएसटी) आणि आधारसक्ती यावर परखड मते मांडली. फक्त नागरिकत्वाची ओळख म्हणून आधार कार्ड द्यावे, अशी काँग्रेस सरकारची भूमिका होती. लहान-मोठ्या गोष्टींसाठीही मोदी सरकारने आधार कार्ड सक्तीचे केले आहे. आधारच्या अवाजवी सक्तीला विरोध करायला हवा, असे ते म्हणाले.

त्यांनी मोदी सरकारवर नोटाबंदी आणि वस्तू सेवा कर लागू करण्याच्या निर्णयावरूनही ताशेरे ओढले. देशाला कोणताही आर्थिक फायदा जीएसटीमुळे झालेला नाही. नोटाबंदीही फसवीच होती. नोटाबंदीचे सांगितलेले फायदे एक वर्षानंतरही दिसत नाहीत, असा दावाही त्यांनी केला.

आधारसक्तीला विरोध करण्याची भूमिका चिदंबरम यांनी



मांडल्यावर त्याला इन्फोसिसचे सहसंस्थापक एन. नारायणमूर्ती यांनी तात्काळ विरोध केला. सामाजिक संरक्षण व्यक्तीला मिळावे म्हणून आधार कार्डचा वापर केला जात असल्यामुळे त्याला विरोध करणे योग्य नाही, असे मत त्यांनी मांडले. चिदंबरम आणि नारायणमूर्ती यांच्यात व्यासपीठावर शाब्दिक जुगलबंदी झाली. अखेर आधारसक्तीचा मुद्दा सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असल्याने न्यायालय जो निर्णय देईल तोच योग्य मानू या, अशी भूमिका चिदंबरम यांनी मांडल्यावर या वादावर पडदा पडला.

# मुंबई महापालिकेचे पुन्हा पेव्हरलाच फेव्हर

**मुंबई-** मुंबईत पेव्हर ब्लॉकला फेव्हर नाही, असे पालिका आयुक्त अजय मेहता यांनी जाहीर केले होते. मात्र त्यांचे अधिकारी त्यांच्या आदेशाला जुमानत नसल्याचे समोर आले आहे. डांबरीकरणाच्या



नावाखाली मुंबईत पुन्हा पेव्हर ब्लॉक बसवण्याचा प्रस्ताव प्रशासनाने स्थायी समितीच्या पटलावर गुरुवारी मांडला. मात्र सर्वच पक्षांनी कडाडून विरोध केल्याने अखेर प्रशासनाला हा प्रस्ताव गुंडाळावा लागला. त्यामुळे डांबरीकरणाचा प्रस्ताव मंजूर करताना प्रशासनाचे पेव्हर ब्लॉकचे निवेदन मात्र स्थायी समितीने फेटाळले.

मालाडमधील रस्त्यांच्या डांबरीकरणाचा प्रस्ताव प्रशासनाने स्थायी समितीपुढे मंजुरीस आणला. मात्र येथील डांबरी रस्त्यांना विविध कारणाने भेगा पडणे, झीज होणे, चर, खड्डे पडल्याने पाणी साचणे तसेच जलवाहिन्या गळतीमुळे रस्ते खराब स्थितीत आहेत. त्यामुळे या रस्त्यांच्या टप्प्याटप्प्याने मजबुतीकरणास २८ कोटी सात लाख ६३ हजार रुपयांचा डांबरीकरण करण्याचा प्रस्ताव होता. मात्र वर्दळीचा व अरुंद रस्ता असल्याने येथे पेव्हर ब्लॉक बसवण्याचे निवेदन अतिरिक्त आयुक्त आय. ए. कुंदन यांनी केले. प्रशासनाच्या या बदललेल्या भूमिकेवर सर्वच पक्षांनी आक्षेप घेतला. यावर स्पष्टीकरण देताना मुंबईत पेव्हर ब्लॉक बसवले जाणार नाहीत, हे प्रशासनाचे धोरण कायम आहे. मात्र वर्दळीचे ठिकाण, अरुंद रस्ते अशा ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. पुन्हा पेव्हर ब्लॉकचे धोरण कसे ठरवण्यात आले, असा सवाल सदस्यांनी केला. मूळ प्रस्ताव डांबरीकरणाचा असताना त्याच अंदाजपत्रकात पेव्हर ब्लॉक कसे बसवता येणार? हा प्रस्ताव गोलमाल करणारा आहे. संभ्रम निर्माण करणारे प्रस्ताव कसे आणले जातात? असा जाब सदस्यांनी विचारला.

# लोकसहभाग मिळावा, त्रिभाजन नको!

**मुंबई- मुंबई महापालिकेचे त्रिभाजन करा, या विषयावर सध्या चांगलेच वादळ उठलेले आहे. जे सध्या महापालिकेत विविध जबाबदाऱ्यांवर कार्यरत आहेत, तसेच ज्यांनी महापौर म्हणून कारकीर्द भूषविलेली आहे, त्यांना या विषयावर काय वाटते? ते जाणून घेण्यात आले असता, बहुतांश मान्यवरांनी त्रिभाजनाची गरज नसल्याचे बोलून दाखविले.**



राष्ट्रवादी काँग्रेस गटनेत्या राखी जाधव म्हणाल्या की, 'तांत्रिकदृष्ट्या पाहिले तर अतिरिक्त आयुक्तांचे कार्यालय परिमंडळ उपायुक्तांप्रमाणेच उपनगरांमध्ये हलविल्यास महापालिकेच्या कामांना वेग येईल. आज उपनगराच्या एका टोकाला असलेल्या मुंबईकराला आपले काम घेऊन शहरातील मुख्यालयापर्यंत धाव घ्यावी लागते. त्यामुळे विषय महत्त्वाचे असले, तरी एकाच वेळी सर्वांना प्राधान्य देणे प्रशासनालाही शक्य होत नाही. त्यामुळे उपनगरात तीन प्रशासकीय कार्यालये असल्यास पालिकेवरील ताण कमी होऊन दर्जेदार सेवा देणे शक्य होऊ शकेल. विरोधी पक्षनेते रवि राजा म्हणाले की, 'त्रिभाजनामुळे नागरी सेवा अधिक वेगवान व सुलभ होतील, पालिका मुख्यालयात एकाच ठिकाणी आयुक्त आणि चार अतिरिक्त आयुक्त असतात. त्याऐवजी पश्चिम व पूर्व उपनगरांत प्रत्येकी एका अतिरिक्त आयुक्तांचे कार्यालय असावे. यामुळे महापालिका मुख्यालयावरील ताण कमी होईल. त्यांना अधिकार वाढवून दिल्यास त्या पातळीवरील समस्या तिथेच सुटतील.'

महापालिकेची सेवा अधिक दर्जेदार करण्यासाठी त्रिभाजन करण्याची गरज नाही. त्यापेक्षा तीन गोष्टींवर अंमल होणे आवश्यक आहे.

महापौरांचे अधिकार वाढवण्यात यावेत. दुसरे म्हणजे, मुंबई शहराच्या एका टोकाला असलेले महापालिका मुख्यालय मध्यवर्ती आणावे. म्हणजे उपनगरात राहणाऱ्या लोकांना आपल्या समस्या घेऊन मुंबईच्या दुसऱ्या टोकाला धावावे लागणार नाही. तिसरे आणि महत्त्वाचे नदी, समुद्र, खारफुटीचे प्रश्नही मुंबई महापालिकेच्या कक्षेत यावेत. यासाठी महापालिकेला जादा अधिकार मिळणे अपेक्षित आहे. बऱ्याच वेळा नदी, खारफुटीच्या परिसरातील अतिक्रमणांवर कारवाईसाठी महापालिकेला जबाबदार धरण्यात येते.

# आदर्श घोटाळाः अशोक चव्हाण यांना मोठा दिलासा

**मुंबई-** आदर्श घोटाळा प्रकरणी वादाच्या भोवऱ्यात अडकलेल्या माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांना मुंबई उच्च



न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. न्यायमूर्ती रणजित मोरे आणि न्यायमूर्ती साधना जाधव यांच्या खंडपीठाने चव्हाण यांच्या विरोधात खटला चालविण्यास राज्यपालांनी दिलेली परवानगी रद्द केली. चव्हाण यांच्या विरोधात कारवाई करण्याची परवानगी सुरुवातीला राज्यपालानी नाकारली होती. मात्र त्यानंतर युती सरकारच्या राजवटीत राज्यपालांनी नव्याने परवानगी दिली. त्याला चव्हाण यांनी आव्हान दिले होते. राजकीय सूडबुद्धीने ही परवानगी देण्यात आली. आपल्या विरोधात खटला चालवण्यासाठी यापूर्वी राज्यपालांनी परवानगी नाकारली होती. पण राज्यात सत्ताबदल होताच आपल्या विरोधात खटल्या चालवण्यास सीबीआयला परवानगी देण्यात आली, असा आरोप चव्हाण यांच्यावतीने करण्यात आला होता. आदर्श प्रकरणी राज्यपालांनी दिलेले चव्हाणांच्या चौकशीचे आदेश बेकायदेशीर ठरवत हायकोर्टाने रद्द केला.

# आता मिळणार गरजेनुसार औषध, पूर्ण पाकीट घेण्याची सक्ती नाही : एफडीए


**मुंबई-** औषधांचे संपूर्ण पाकीट विकत घेण्याऐवजी लवकरच रुग्णांना गरजेनुसार औषध खरेदी करता येणार आहे. त्यामुळे संपूर्ण पाकीट विकत घेण्याची सक्ती रुग्णांना करता येणार नाही. याविषयी नुकतेच अन्न व औषध प्रशासन विभागाने औषध विक्रेत्यांना निर्देश दिले आहेत. तसेच, नुकतेच ड्रग कंट्रोलर जनरल ऑफ इंडियालाही एफडीएने पत्र पाठवून त्यात औषधांची छोटी पाकिटे तयार करण्याविषयी निवेदन दिले होते.



अन्न व औषध प्रशासनाच्या या निर्णयामुळे औषधांचा अपव्यय आणि दुष्परिणामांना आळा बसेल, असे ऑल केमिस्ट अॅण्ड ड्रगिस्ट असोसिएशनने सांगितले. अन्न व औषध प्रशासन विभागाचे सहआयुक्त अर्जुन खडतरे म्हणाले की, अनेकदा रुग्णांना कमी मात्रा लागते. परंतु, औषध विक्रेत्यांना औषधांच्या स्ट्रिप्स कापणे शक्यत नसते. औषधांच्या स्ट्रिप्स कापल्यामुळे बऱ्याचदा त्या पाकिटावरील तारीख, बॅच क्रमांक, एक्स्पायरी डेट कापले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे आम्ही ड्रग कंट्रोलर जनरल ऑफ इंडियाला संपूर्ण माहिती असलेली औषधांची छोटी पाकिटे बनविण्याविषयी पत्र लिहिले आहे.

# वापरा आणि फेका हेच राज्यकर्त्यांचे धोरण झालंय
## *धनगर व मराठा आरक्षणावरुन उद्धव ठाकरेंचा भाजपाला टोला*


**मुंबई-** धनगर व मराठा समाजाच्या आरक्षणावरुन शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पुन्हा एकदा भाजपाला टार्गेट केले आहे. 'आश्वासन देणारे राज्यकर्ते बनतात आणि त्यानंतर त्यांनीच दिलेल्या आश्वासनांचे बुडबुडे हवेत विरून जातात. या भूलथापांना भुलून त्यांना सत्तेवर बसविणारे लोक पुन्हा रस्त्यावरच राहतात. वापरा आणि फेका हेच राज्यकर्त्यांचे धोरण झाले आहे. धनगर व मराठा समाज त्याच अवस्थेतून जाताना दिसत आहे. जानकर, मेटे व खोत मंत्री झाले व समाजाचे प्रश्न सोडवले असे सरकारने जाहीर करून टाकले', अशा शब्दांत उद्धव ठाकरे यांनी भाजपावर टीका केली आहे. नागपुरात धनगर समाजानं केलेल्या आंदोलनावरुन उद्धव ठाकरे यांनी सामना संपादकीयमधून भाजपावर निशाणा साधला आहे. सत्तेवर येताच सत्ताधाऱ्यांना अनेक गोष्टींचा विसर पडतो. विरोधात असताना सत्ताधाऱ्यांना खाली खेचण्यासाठी हवे ते आरोप करायचे. निवडणूक प्रचारात आश्वासनांची खैरात



करायची व सत्तेवर येताच ज्या प्रश्नांवर भांडलो त्याबाबत स्वतःच्या तोंडात बोळा कोंबून खुर्च्या गरम करायच्या. सर्वच पातळ्यांवर सध्या हेच चालले आहे. महाराष्ट्रातील विद्यमान राज्यकर्त्यांनी निवडणुकीपूर्वी धनगर समाजाला आरक्षण देण्याची हमी दिली होती. बारामतीत धनगर समाजाचे नेते उपोषणाला बसले होते व हजारो धनगर बांधव तेथे जमले असताना आजचे मुख्यमंत्री (तेव्हाचे विरोधक) बारामतीत जाऊन धनगर समाजाच्या उद्धाराची वचने देत होते. आरक्षण झालेच म्हणून समजा. फक्त एकदा हातात सत्ता येऊ द्या. मग बघा, असे भाजपतर्फे सांगितले गेले, पण तीन वर्षांनंतरही तोंडास पुसलेली पाने चघळीत धनगर समाज रस्त्यावरच आहे.

# अभ्यासात व्यत्यय होत असल्याने आवाज कमी करा, असे सांगणे बेतले जिवावर

**मुंबई-** अभ्यासात व्यत्यय होत असल्याने आवाज कमी करा, असे सांगणे मुलुंडमधील बारावीतील विद्यार्थ्याच्या जिवावर बेतले. सोमवारच्या या घटनेत अलाउद्दिन पठाण (१८) याचा मृत्यू झाला. या प्रकरणी मुलुंड पोलिसांनी अल्पवयीन मुलाला बुधवारी अटक केली आहे. मुलुंड पश्चिमेकडील शंकर टेकडी परिसरात पठाण कुटुंबीय राहते. अलाउद्दिन पठाण हा भांडुपच्या डीएव्ही महाविद्यालयात वाणिज्य शाखेच्या पहिल्या वर्षाचे शिक्षण घेत होता. सोमवारी दुपारी नेहमीप्रमाणे तो अभ्यासासाठी घराबाहेर बसला होता. घरासमोरील मोकळ्या जागेत मुले क्रिकेट खेळत होती. त्यांच्या गोंगाटामुळे पठाणने त्यांना आवाज कमी करण्यास सांगितले. याच रागात एका अल्पवयीन मुलाने त्याच्यासोबत वाद घालत त्याला मारहाण सुरू केली. यात पठाण जखमी झाला. त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी पठाण याच्या वडिलांच्या तक्रारीवरून अल्पवयीन मुलाला मुलुंड पोलिसांनी अटक केली असून अधिक तपास सुरू आहे.



# वाहतूक हवालदारांची प्रतिमा जनमानसात चांगली करण्याची आवश्यकता - उच्च न्यायालय

**मुंबई :** वाहतूक हवालदारांची प्रतिमा जनमानसात चांगली करण्याची आवश्यकता आहे, असे म्हणत न्यायालयाने याबाबत वाहतूक विभागाला नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्याची सूचना गुरुवारी केली.

वाहतूक हवालदारांबरोबर लोक रस्त्यातच हुज्जत घालतात. त्यातच त्यांचा वेळ जातो. वाहतूक पोलिसांचा सामान्यांनी आदर करावा व त्यांची प्रतिमा जनमानसात चांगली व्हावी, यासाठी जनजागृतीची मोहीम हाती घ्या, अशी सूचना न्या. नरेश पाटील व न्या. एन. डब्ल्यू. सांबरे यांच्या खंडपीठाने वाहतूक विभागाला केली.



वाहतूक विभागात असलेल्या भ्रष्टाचाराबद्दल या विभागातच काही काळ काम केलेले वाहतूक हवालदार सुनील टोके यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. वाहतूक पोलिसांचे रेट कार्डच त्यांनी न्यायालयासमोर सादर केले. याची उच्च न्यायालयाने गांभीर्याने दखल घेत या याचिकेचे जनहित याचिकेमध्ये रूपांतर केले.

उच्च न्यायालयाने नागरिकांनाही सामाजिक जबाबदारीचे भान ठेवण्याचे आवाहन केले. नागरिकांनी स्वत:हूनच शिस्त लावून घेतली पाहिजे. तसेच वरिष्ठांनीही कनिष्ठांवर लक्ष ठेवले पाहिजे. त्यासाठी मोबाइल कार उपलब्ध करा, असे न्यायालयाने म्हटले.

# मुंबईकरांचा 'बेस्ट' प्रवास महागणार, भाडेवाढीचा अर्थसंकल्प मंजूर

**मुंबई-** आर्थिक संकटात असल्याने अखेर तिकिटांच्या दरात वाढ करण्याचा निर्णय बेस्ट प्रशासनाने घेतला आहे. हा प्रस्ताव मंजूर झाल्याने सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षात एक लाख रुपये शिलकीचा अर्थसंकल्प स्थायी समितीने आज मंजूर केला. रिक्त पदे व आस्थापना खर्च कमी करणे, बसमार्गांमध्ये सुधारणा, लांबच्या प्रवासाचे भाडे वाढवणे अशा सुधारणांसह या अर्थसंकल्पाला मंजुरी देण्यात आली आहे. सन २०१८-२०१९चा ८८० कोटी ८८ लाख रुपये तुटीचा अर्थसंकल्प गेल्या महिन्यात बेस्ट समितीने मांडला. मात्र हा अर्थसंकल्प प्रथेनुसार शिलकीचा दाखवून मगच बेस्ट प्रशासनाला पालिका महासभेपुढे पाठविता येणार होता. त्यानुसार ५४६१.३७ कोटी उत्पन्न व ५४६१.३६ कोटी रुपये खर्च दाखवून एक लाख रुपये शिलकीचा अर्थसंकल्प बेस्ट समितीने मंजूर करून स्थायी समितीकडे पाठविला.



# बेस्टमधील ४८९४ पदे रद्द, भत्त्यांमध्ये कपात केल्यानंतर नोकरीही धोक्यात



**मुंबई-** महापालिका प्रशासनाच्या सूचनेनुसार बेस्ट उपक्रमाने तयार केलेल्या कृती आराखड्यावर लवकरच अंमल होणार आहे. आर्थिक संकाटात असलेल्या बेस्टने बचतीसाठी सर्व योजना, विविध सवलती व कर्मचा-यांचे भत्ते यांनाही कात्री लावली आहे. त्यानुसार बेस्ट उपक्रमामधील तब्बल ४,८९४ पदे रद्द करण्याचा प्रस्ताव प्रशासनाने बेस्ट समातीच्या मंजुरीसाठी पाठविला आहे. बेस्टने सन २०१७-१८चा ५६० कोटी तर सन २०१८-१९चा ८९० कोटी रुपये तुटीचा अर्थसंकल्प सादर केला आहे. आर्थिक मदत मिळण्याची मागणी बेस्टने पालक संस्था असलेल्या मुंबई महापालिकेकडे मदत मागितली आहे. मात्र बेस्टमध्ये आर्थिक सुधारणा करण्याच्या अटीवर ही मदत बेस्ट उपक्रमाला करण्यात येणार आहे. त्यानुसार कामगारांचे भत्ते गोठवणे, रिक्त पदे न भरणे, बेस्ट ताफा आणि प्रवाशांच्या भाड्यात सुधारणा केली जाणार आहे. आस्थापना खर्च कमी करण्यासाठी बेस्ट प्रशासनाने सुरक्षा व दक्षता विभागातील १७९, स्थापत्य अभियांत्रिकी विभागातील ७९, विद्युत पुरवठा विभागातील ३९४, परिवहन अभियांत्रिकी विभागातील ८७५ तर वाहतूक विभागातील ३३६७ पदे रद्द करण्याचे ठरविले आहे. यामध्ये बसचालकांची १५९५, वाहकांची १६५७, स्वचकांची ३००, मॅकेनिकची ३०८, जोडारी १५३, नवघाणी २५० पदांचा समावेश आहे. एकेकाळी बसचा ताफा ४४५० होता. सध्या ३५०० बसचा ताफा आहे. हा ताफा आणखी कमी करून ३३००च्या आसपास आणला जाणार आहे. बेस्टमध्ये भाडेतत्त्वावर बसगाड्या घेतल्या जाणार आहेत. यामुळे बेस्टमधील अधिकारी आणि कामगारांची ४,८९४ पदे रद्द केली जाणार आहेत.

# संपादकीय... व्यापारी बेपत्ता..!


संपादकः- दिपक मोरेश्वर नाईक

महाराष्ट्रातील अनेक व्यापाऱ्यांनी आपल्या व्यवसायाची ठिकाणे बदलून राज्य सरकारच्या तिजोरीत दोन हजार ८६० कोटी रुपयांचा विक्रीकर भरलाच नसल्याची कबुली राज्याचे अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी विधानसभेत दिली आहे. राज्याच्या सध्याच्या आर्थिक स्थितीचा विचार करता ही रक्कम बरीच मोठी असून सरकारला काळजीत टाकणारी आहे. पण मुळात हे सगळे का होते, याचा विचार किमान आता तरी राज्य सरकारने करण्याची आवश्यकता आहे. विक्रीकर हे राज्याच्या महसूलाचे मोठे साधन असेल, तर त्याची वसुली करण्यासाठी; तसेच त्याच्या नोंदी ठेवण्यासाठी राज्य सरकारने जबाबदार यंत्रणा उभी करण्याची गरज यापूर्वी अनेकदा पुढे आली आहे. परंतु आत्तापर्यत राज्यात सत्तेत आलेल्या प्रत्येक सरकारने त्याकडे अक्षम्य दुर्लक्ष केले. विक्रीकराचा विषय फक्त राज्याच्या अर्थसंकल्पाच्या वेळेसच चर्चेत येतो. आता तर जीएसटीच्या अंमलबजावणीनंतर विक्रीकरही संपला आहे. पण राज्यातील विक्रीकर विभागाच्या म्हणजेच आताच्या जीएसटीच्या कोणत्याही कार्यालयात जा, तेथे येणारा अनुभव हा विदारक असतो. या विभागाचे प्रत्येक कार्यालय हे दलालांचा सुळसुळाट असलेले असते, इतकेच नव्हे तर या कार्यालयातील बहुतेक कारभार हा कंत्राटी कामगारांच्या मदतीने चालतो.



साहजिकच गैरव्यवहार होण्यास संपूर्ण पोषक वातावरण सरकारनेच तयार करून दिलेले असल्यावर यापेक्षा आणखी काही घडणे अपेक्षितच नाही. त्यातच गेल्या दशकभरात या विभागामध्ये संगणकाचा वापर वाढला आहे. पण संगणक प्रणाली तयार करण्याबाबत सरकारने कधीही औत्सुक्य दाखविलेले नाही. इतकेच कशाला तर या विभागाची स्वतंत्र सव्हर यंत्रणा उभी करून, अद्ययावत प्रणाली असलेले संगणक घेऊन या खात्याचा कारभार कधीही चालत नाही. येथील बहुतेक संगणकांवर पायरेटेड सॉफ्टवेअर लावलेली आहेत. त्यामुळे, ही यंत्रणा ठप्प होण्याच्या घटना या पूर्वीही घडल्या आहेत. त्याचप्रमाणे या यंत्रणेत जमा होणारा माहितीसाठा कोणालाही सहजपणे चोरता येईल, इतक्या प्राथमिक पातळीवरची सुरक्षा यंत्रणा या प्रणालींमध्ये वापरली जाते. ही यंत्रणा सक्षम असती तर राज्याच्या विक्रीकर विभागात नोंदविलेल्या व्यापाऱ्यांना वेगळ्या नावाने किंवा वेगळ्या पत्त्यावरून व्यवसाय करणे शक्य झाले नसते. साहजिकच हा करबुडवेपणाही करता आला नसता. सध्याच्या यंत्रणेतील त्रुटींमुळे एकच व्यापारी वेगवेगळ्या नावाने व्यवसाय करू शकतो व त्याचा फायदा या चोरट्या व्यापाऱ्यांनी उठविला असण्याची शक्यता आहे. त्याचप्रमाणे तंत्रज्ञानाचा पुरेसा फायदा न घेता प्रणाली तयार करण्यात आली असल्याने तेथे अधिकाऱ्यांना आपले अधिकार वापरण्याची मुभा आहे. साहजिकच गैरव्यवहारासाठी कुरण मोकळे आहे. खरेतर या बुडविलेल्या कराच्या पंचवीस टक्के रक्कम खर्च करून सरकारने ही यंत्रणा शक्तिशाली केली, तर ही वसुली करणे शक्य होईलच; पण त्याचबरोबर वसुलीही अधिक प्रभावी होऊन महसूल वाढेल. या व्यापाऱ्यांच्या पॅन आणि आधार क्रमांकाची नोंद राज्य सरकारकडे असेल व ती योग्य पद्धतीने वापरली तरीही यातील ऐंशी टक्के वसुली करणे शक्य होईल, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. त्यामुळे आता तरी सरकारने गंभीरपणे या प्रकरणात लक्ष घालायला हवे.

# ग्राहक प्रबोधन : चुकीच्या 'एसएमएस'ची चूक न सुधारणे ही घोडचूकच!

**आजकाल सगळेच व्यवहार हे ऑनलाइन होतात. त्यामुळे सेवा पुरवठादार कंपन्यांकडून ग्राहकांना प्रत्येक बाब लघुसंदेशाद्वारे कळवली जाते. परंतु एखाद्या चुकीच्या 'एसएमएस'मुळे (लघुसंदेश) नुकसान झाले तर ग्राहक म्हणून त्याची नुकसानभरपाई मिळू शकते का, असा प्रश्न निर्माण झाला, तर त्याचे उत्तर 'होय' असे आहे. चुकीचा लघुसंदेश पाठवणे हे चूक आहेच, परंतु ही चूक न सुधारणे ही घोडचूकच नव्हे तर निष्काळजीपणा असल्याचा निर्वाळा दिल्ली राज्य ग्राहक वाद आयोगाने नुकताच दिला आहे.**



विजय प्रताप सिंग यांचा मुलगा अक्षत याला अलाहबादहून नवी दिल्लीला जायचे होते. २९ मे रोजी तो हा प्रवास करणार होता. त्यामुळे विजय यांनीच ७ मे रोजी 'आयआरसीटीसी'च्या संकेतस्थळावरून एक्स्प्रेसचे तिकीट त्याच्यासाठी खरेदी केले. त्यांनी 'महाबोधी एक्स्प्रेस'चे टू-टायर वातानुकूलित डब्याचे तिकीट अक्षतसाठी खरेदी केले होते. मात्र हे तिकीट आरक्षणाच्या प्रतीक्षा यादीत होते. ठरल्या दिवशीच अक्षतला प्रवास करता यावा म्हणून विजय यांनी 'तात्काळ' योजनेंतर्गत याच गाडीचे तिकीटही त्याच्यासाठी खरेदी केले. वडिलांनी तिकीट आरक्षित केल्याने अक्षतही निश्चिंत होता. परंतु त्यानंतर काहीच वेळाने गाडी रद्द करण्यात आल्याचा लघुसंदेश रेल्वेकडून विजय यांना पाठवण्यात आला. त्यामुळे रेल्वेच्या नियमांनुसार त्यांनी खरेदी केलेल्या आरक्षित तिकिटांचा परतावा त्यांना परत मिळावा याकरिता त्यांना संकेतस्थळावरून ही तिकिटे रद्द करण्याचेही या लघुसंदेशाद्वारे कळवण्यात आले होते. त्यानुसार विजय यांनी खरेदी केलेली दोन्ही तिकिटे रद्द केली. परंतु अक्षतला दिल्लीला जाणे आवश्यक होते आणि त्याची या सगळ्या प्रकारामुळे गैरसोय होऊ नये तसेच त्याला ठरल्या वेळेत अलाहबादवरून दिल्लीला जाणे शक्य व्हावे, म्हणून विजय यांनी त्याच्या प्रवासासाठी 'अॅप'आधारित टॅक्सीची व्यवस्था केली. त्यासाठी त्यांना १५ हजार रुपये खर्च आला.

दरम्यान, विजय यांना रेल्वेकडून आरक्षणाच्या प्रतीक्षा यादीतील तिकिटाचा परतावा मिळावा, परंतु 'तात्काळ' योजनेंतर्गत खरेदी केलेल्या तिकिटाचे पैसे मात्र देण्यात आले नाहीत. त्याबाबत त्यांनी चौकशी केली तेव्हा त्यांना गाडी रद्द करण्यात आली नव्हती, असे कळले. एवढेच नव्हे, तर गाडी रद्द झाल्याचा लघुसंदेश त्यांना अनवधानाने झालेल्या चुकीतून पाठवण्यात आल्याचेही सांगण्यात आले. या प्रकाराने विजय यांचा संताप झाला. त्यामुळे 'तात्काळ' योजनेंतर्गत खरेदी केलेले तिकीट रद्द केल्याचा परतावा देण्याची विनंती रेल्वेकडे केली. हे तिकीट त्यांनी स्वत: रद्द केले नव्हते, तर रेल्वेकडून करण्यात आलेल्या चुकीच्या लघुसंदेशामुळे त्यांना ते रद्द करावे लागले, असा दावा करत त्यांनी त्याचा परतावा देण्याची मागणी केली. परंतु तिकिटाच्या परताव्यासाठी वारंवार तगादा लावूनही रेल्वे प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष केल्याने संतापलेल्या विजय यांनी अखेर 'आयआरसीटीसी'विरोधात दिल्ली पूर्व येथील ग्राहक तक्रार निवारण मंचाकडे धाव घेत तक्रार नोंदवली. ग्राहक मंचानेही ती योग्य ठरवत रेल्वे प्रशासनाला निकृष्ट सेवा दिल्याप्रकरणी दोषी ठरवले. रेल्वे प्रशासनाच्या निकृष्ट सेवेमुळे विजय यांना प्रचंड मानसिक त्रास सहन करण्याबरोबरच आर्थिक फटकाही बसल्याचे आयोगाने नमूद केले. तसेच तिकिटाचा परतावा, टॅक्सीला आलेला खर्च आणि नुकसानभरपाई म्हणून २५ हजार रुपये विजय यांना देण्याचे आदेश ग्राहक मंचाने रेल्वे प्रशासनाला दिले.

रेल्वे प्रशासनाने ग्राहक मंचाच्या या निर्णयाला दिल्ली राज्य ग्राहक वाद निवारण आयोगाकडे आव्हान दिले. रेल्वे प्रशासनाने या वेळी तांत्रिक मुद्दा पुढे करत विजय यांना ग्राहक मंचाकडे तक्रार करण्याचा कुठलाही अधिकार नसल्याचा दावा केला. विजय यांनी मुलाच्या नावे तिकीट खरेदी केले होते. त्यामुळे त्यांना ही तक्रार करण्याचा अधिकार नाही, असा दावा प्रशासनाचा होता. एवढेच नव्हे, तर ज्या गाडीचे तिकीट विजय यांनी मुलाच्या नावे खरेदी केले होते, ती गाडी रद्द झालीच नव्हती. त्यामुळे निकृष्ट सेवा दिल्याचा प्रश्न उद्भवत नसल्याचा आणि निव्वळ अनवधानाने झालेल्या चुकीतून पाठवलेल्या लघुसंदेशासाठी त्यांना दोषी धरले जाऊ शकत नाही, असा दावाही रेल्वे प्रशासनाने अपिलात केला.

मात्र रेल्वे प्रशासनातर्फे चुकीचा लघुसंदेश पाठवण्यात आल्याचे आयोगानेही योग्य ठरवले. चूक सुधारणारा दुसरा लघुसंदेश विजय यांना पाठवून चूक झाल्याचे कबूल करण्यासह गाडी रद्द झाली नसल्याचे सांगून रेल्वे प्रशासन हा वाद सहज मिटवू शकले असते, असे विजय यांच्यावतीने आयोगाला सांगण्यात आले. त्यांच्या या म्हणण्यालाही आयोगाने सहमती दर्शवली. परंतु रेल्वे प्रशासनाकडून ही काळजी घेण्यात आली नाही. रेल्वे प्रशासनाची ही कृती म्हणजे निकृष्ट सेवा असल्याचा निर्वाळा आयोगाने दिला. त्यामुळेच चुकीचा लघुसंदेश पाठवून घातलेल्या गोंधळासाठी रेल्वे प्रशासन जबाबदार असल्याचे आयोगाने स्पष्ट केले. मात्र आपण तर रेल्वेसाठी काम करणारी एक एजंट कंपनी आहोत. त्यामुळे आपल्याला निकृष्ट सेवेसाठी जबाबदार धरता येऊ शकत नाही, असे सांगत 'आयआरसीटीसी'ने जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न केला. 'आयआरसीटीसी'च्या या दाव्यामुळे आयोगाने त्याची शहानिशा करण्याचे ठरवले. त्यानुसार 'आयआरसीटीसी'च्या या दाव्याची शहानिशा केली गेली असता कंपनी ही रेल्वे प्रशासन आणि तिच्या आर्थिक नियंत्रणाखाली असल्याचे उघड झाले. त्यामुळे रेल्वे प्रशासन आणि 'आयआरसीटीसी' या एका नाण्याच्या दोन बाजू असल्याचे, त्यांचा आर्थिक स्रोत एकच असल्याचे आयोगाने नमूद केले. तसेच ही बाब लक्षात घेता तक्रार कुणाविरुद्ध करण्यात आली आहे हा मुद्दाच गौण ठरत असल्याचेही आयोगाने स्पष्ट केले. त्याचप्रमाणे २४ ऑक्टोबर रोजी आयोगाने 'आयआरसीटीसी'चे अपील फेटाळून लावले आणि जिल्हा ग्राहक मंचाने नुकसानभरपाई देण्याचा तसेच निकृष्ट सेवा दिल्याप्रकरणी दोषी ठरवल्याचा दिलेला निर्णय योग्य ठरवला.

# जुन्या ठाण्याचा पुनर्विकास अडचणीत



***ठाणे - ठाणे शहरातील जुन्या आणि मोडकळीस आलेल्या इमारतींना यापुढे विकास हस्तांतर हक्क (टीडीआर) देता येणार नाही, अशी स्पष्ट भूमिका महापालिका आयुक्त संजीव जयस्वाल यांनी सर्वसाधारण सभेपुढे मांडल्याने जुन्या ठाणे शहरातील पुनर्विकासाला खीळ बसण्याची भीती व्यक्त होत आहे. राज्य सरकारच्या नव्या टीडीआर धोरणानुसार असे करणे चुकीचे ठरेल, असेही ते म्हणाले. ठाणे शहरातील भाजपच्या काही नगरसेवकांनी गुरुवारी महापालिकेच्या विकास हस्तांतर हक्क धोरणाविरोधात आरोपांच्या फैरी झाडल्या होत्या. त्यावर उत्तर देताना आयुक्तांनी ही भूमिका मांडल्याने भाजप नेत्यांची कोंडी झाली आहे.***

तीन हात नाका येथील वंदना सोसायटीच्या पुनर्विकासाच्या मुद्द्यावर महापालिकेच्या शहरविकास विभागाने तब्बल २०० कोटी रुपयांचा टीडीआर घोटाळा केल्याचा आरोप भाजप नगरसेवकांनी गुरुवारी सर्वसाधारण सभेपुढे केला होता. यापूर्वी भाजपच्या शहरातील काही पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषद घेऊन यासंबंधीचे आरोप केले होते. महापालिका प्रशासनाने मात्र असा कोणताही घोटाळा झालेला नाही, तसेच संबंधित विकसकास टीडीआर देण्याचा अंतिम प्रस्ताव मंजूर करण्यात आलेला नाही हे यापूर्वीच स्पष्ट केले आहे.

असे असताना भाजपचे नौपाडा आणि पाचपाखाडी भागातील नगरसेवक नारायण पवार आणि सुनेश जोशी यांनी गुरुवारी सर्वसाधारण सभेत या विषयावर शहरविकास विभागाविरोधात आरोपांच्या फैरी झाडल्या. या सर्व आरोपांचे उत्तरे शुक्रवारी आयुक्त जयस्वाल यांनी दिली. वंदना सोसायटीच्या प्रश्नावर महापालिका प्रशासनावर करण्यात आलेले आरोप बिनबुडाचे असून यासंबंधी स्पष्टीकरण देऊनही केल्या जाणाऱ्या आरोपांविषयी त्यांनी नाराजी व्यक्त केली. धोकादायक इमारतींचा पुनर्विकास शक्य व्हावा यासाठी महापालिका अशा इमारतींना मूळ चटईक्षेत्र आणि प्रोत्साहनपर अतिरिक्त ०.५० इतके टक्के बांधकामास परवानगी देते. याशिवाय रस्त्याच्या रुंदीनुसार स्वतंत्र विकास हस्तांतर हक्क देण्याची तरतूद आहे. मात्र, सरकारच्या नव्या धोरणानुसार नऊ मीटर रुंदीपेक्षा कमी आकाराच्या रस्त्यालगत असलेल्या इमारतींना पुनर्विकासासाठी विकास हस्तांतर हक्क देता येणार नसल्याचे जयस्वाल यांनी स्पष्ट केले. २० जानेवारी, २०१६ रोजी राज्य सरकारने विकास हस्तांतर हक्कानुसार (टीडीआर) मिळणाऱ्या वाढीव चटईक्षेत्राचा वापर नेमका कसा आणि कुठे करायचा यासंबंधी धोरण स्पष्ट केले आहे.

# पालघर जिल्ह्यात मद्य तस्करीला उधाण!

## राज्य उत्पादन शुल्क विभागाची जोरदार कारवाई; १० दिवसांत लाखो रुपयांचे मद्य जप्त



**वसई-** नाताळ आणि ३१ डिसेंबरच्या पार्श्वभूमीवर परराज्यातून मोठ्या प्रमाणावर बेकायदा मद्य वसई-विरारमध्ये आणले जात आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाने चोरट्या मद्याविरोधात जोरदार कारवाई सुरू केली आहे. गेल्या दहा दिवसांत विविध ठिकाणी केलेल्या कारवाईत लाखो रुपयांचे मद्य जप्त करण्यात आले आहे. मद्यविक्रीवर शासनाकडून उत्पादन शुल्क आकारले जाते. राज्यात मद्यावरील उत्पादन शुल्क ५० टक्के असून ते इतर राज्यांपेक्षा अधिक आहे. पालघर जिल्ह्याला लागून दिव, दमण, दादरा नगर हवेली आदी केंद्रशासीत प्रदेश आहेत. तेथे मद्यावरील उत्पादन शुल्क अत्यंत कमी म्हणजे १२ टक्कयांपेक्षा कमी आहे. त्यामुळे तेथे मद्य स्वस्त दरात मिळते. याचा फायदा घेत या प्रदेशातून चोरट्या मार्गाने मद्य पालघर जिल्ह्यात आणि तेथून पुढे मुंबईत नेले जाते. यामुळे राज्य शासनाचा कोट्यावधी रुपयांचा महसूल बुडत असतो. त्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभाग बेकायदा मद्य वाहतुकीवर कारवाई करत असते. नववर्षांच्या पार्श्वभूमीवर या राज्यांतून मोठ्या प्रमाणावर चोरून मद्य आणले जात असल्याने राज्य उत्पादक शुल्क विभागाचे अधीक्षक व्ही. एम. लेंगरे यांनी सर्व विभागाला दक्षतेचे आदेश दिले होते. त्यासाठी सर्व महामार्गाच्या नाक्यांवर तपासणी नाके उघडण्यात आले होते, तसेच जागोजागी छापासत्र सुरू करण्यात आले आहे.

# मीरा-भाईंदरमधून ५२ किलो पिशव्या जप्त, पिशव्यांची दिवसरात्र खुलेआम विक्री



**मीरा रोड-** कायद्याने बंदी असूनही शहरात सर्रास प्लास्टिक पिशव्यांची विक्री व वापर होत असतानाच आता मीरा- भाईंदर प्लास्टिक बॅग मर्चंट असोसिएशनने दिलेल्या माहितीनंतर महापालिकेने ३ विक्रेत्यांकडून १५ हजार दंड वसूल करत ५२ किलो प्लास्टिक पिशव्या जप्त केल्या आहेत.

कायद्याने ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या पिशव्यांवर बंदी असून आरोग्यास तसेच पर्यावरणास त्या घातक आहेतच शिवाय पावसाळ्यात याच पिशव्यांमुळे पूरस्थिती निर्माण होण्याचे प्रकार घडतात. तसे असताना शहरात सर्रास पातळ पिशव्यांची दिवसरात्र खुलेआम विक्री व वापर केला जातो. महापालिका प्रशासन मात्र या प्लास्टिक माफियांना पाठीशी घालत असून थातूरमातूर कारवाईचे नाटक करते. पालिकेकडून ठोस कारवाई होत नसतानाच आता खुद्द मीरा- भाईंदर प्लास्टिक बॅग मर्चंट असोसिएशननेच पिशव्यांविरोधात कारवाईसाठी पुढाकार घेतला आहे. संस्थेचे सुकेतू नानावटी व अन्य पदाधिकारी आदींनी कायद्याने बंदी असताना प्लास्टिक पिशव्या विकणाऱ्यांची माहिती पालिकेच्या आरोग्य विभागास देण्यास सुरूवात केली आहे.

# आता अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या बसचालकांवर गुन्हे

**ठाणे-** महापालिका परिवहन उपक्रमाच्या (टीएमटी) बसथांब्यांवरील प्रवाशांची अवैध वाहतूक करणाऱ्या खासगी बसविरोधात प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून (आरटीओ) कारवाई होत नसल्याने आता ठाणे महापालिकेने अशा बसचालकांविरोधात थेट



पोलिसांत तक्रार दाखल करून गुन्हे नोंदवण्याचा निर्णय घेतला आहे. अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या बसची छायाचित्रे काढून यासंबंधी पोलीस ठाण्यात रीतसर तक्रार करण्यात येईल, असा निर्णय ठामपाच्या परिवहन समितीच्या बैठकीत घेण्यात आला. ठाणे स्थानक ते घोडबंदर या मार्गावर खासगी बसगाड्यांमधून अवैध प्रवासी वाहतूक करण्यात येते. टीएमटीच्या बसगाड्यांची अपुरी सुविधा आणि रिक्षाचालकांची मनमानी यामुळे बहुतांश प्रवासी या बसमधून प्रवास करतात. याचा आर्थिक फटका टीएमटीला सोसावा लागतो. या पार्श्वभूमीवर काँग्रेसचे सचिन शिंदे यांनी परिवहन समितीच्या बैठकीत परिवहन प्रशासनाच्या कारभारावर टीकास्त्र सोडले. शहरात तब्बल २३० खासगी बसगाड्या अवैध प्रवासी वाहतूक करत असल्याचा दावा त्यांनी केला. अवैध वाहतूक प्रवाशांसाठी धोकादायक ठरू शकते. अशा बसना अपघात झाल्यास जबाबदार कोण, असा सवालही परिवहन समितीच्या बैठकीत करण्यात आला. अशा बसगाड्यांवर काय कारवाई केली, असा प्रश्नही बैठकीत उपस्थित झाला. यावर उत्तर देताना पालिका प्रशासनाने आरटीओकडून कारवाई होत नसल्याची भूमिका मांडली. प्रत्येक तीन महिन्यांनी ठाण्याच्या सह पोलिस आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक होते. या बैठकीत उपप्रादेशिक परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांकडे टीएमटीच्या बस थांब्यावरून बेकायदा प्रवाशांची वाहतूक करणाऱ्या खासगी बसगाड्यांच्या छायाचित्रासह तक्रारी केल्या.

# कल्याण-भिवंडी एसटी आगारांचे रूप पालटणार

**कल्याण-** अतिशय दुर्दशा होऊनही गेल्या दोन वर्षांपासून रखडलेल्या ठाणे जिल्ह्यातील कल्याण आणि भिवंडी या सदैव गजबजलेल्या एसटी आगारांच्या पुनर्बांधणीला आता वेग आला आहे. या दोन्ही बसस्थानकांचे छप्पर धोकादायक बनले असल्याने त्याची दुरुस्ती करण्याची गरज स्थानक व्यवस्थापकांनी बांधकाम विभागाला दिले होते. त्यानुसार या स्थानकांच्या पुनर्बांधणीसाठी वास्तुविशारद नेमण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कल्याण बस स्थानक आणि भिंवडी बस स्थानकांत प्रवाशांची मोठी गर्दी असते. या दोन्ही आगारांतून राज्यभरात एसटीच्या गाड्या सुटतात. त्यामुळे सणासुदी तसेच सुटीच्या कालावधीत या आगारांत प्रवाशांची मोठी गर्दी असते. परंतु, या दोन्ही बसस्थानकांची अवस्था मात्र अतिशय दयनीय झाली आहे. कल्याण आगार स्थानकाची अतिशय बिकट अवस्था असून येथील खांब केव्हाही कोसळेल अशा अवस्थेत आहे.

# वसई-विरारमधील रिसॉर्टवर कारवाई?

**वसई-** विरारमधील असुरक्षित रिसॉर्टचा मुद्दा विधिमंडळात उपस्थित झाल्यानंतर शहरातील रिसॉर्ट आणि फार्म हाऊसच्या सुरक्षेची तपासणी करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. शहरातील ८३ रिसॉर्ट आणि फार्म हाऊसच्या सुरक्षेचा आढावा घेण्यात येणार असून जर रिसॉर्ट धोकादायक असल्याचे आढळल्यास रिसॉर्टचालकांवर कारवाई करण्यात येणार आहे. रिसॉर्टमधील जलतरण तलावांमध्ये होणाऱ्या मृत्यूप्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांनीही सुरक्षेचा आढावा घेण्याचे आदेश दिले आहे. वसई-विरार शहरातील निसर्गसौंदर्याचा उपयोग करत अनेक



रिसॉर्ट आणि फार्म हाऊस उभी राहिली आहेत. वसईबरोबरच मुंबई ठाण्यातील पर्यटक मोठ्या संख्येने या रिसॉर्ट्समध्ये येत असतात. मात्र बहुतांश रिसॉर्ट अनधिकृत असून रिसॉर्टचालकांकडून नियमांचे उल्लंघन केल्याचे आढळून आले आहे. वसई गाव, भुईगाव, कळंब, राजोडी, अर्नाळा, वटार (सत्पाळा), वासळई, गिरीज, मर्सेस, रानगाव, तिल्हेर, भालिवली, कौलार खुर्दे, मौजे घाटेघर परिसरात सरकारी जागांवर अतिक्रमण करून बेकायदा रिसॉर्ट तसेच फार्म हाऊस बांधण्यात आलेली आहेत.

# मट्रोसाठी ६२ हजार ९४३ कोटी


## १५७ किलोमीटरचे मेट्रोचे जाळे


**मुंबई : मुंबई शहर आणि उपनगरासह मुंबई महानगर प्रदेशातील वाहतूककोंडीतून नागरिकांची मुक्तता करण्यासाठी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) ने कामाचा वेग वाढवला असून, यासाठी तब्बल ६२ हजार ९४३ कोटींची गुंतवणूक करण्यात येत आहे.**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून मिळालेल्या माहितीनुसार, दोन मेट्रो प्रकल्पांच्या अंमलबजावणीस सुरुवात झाली आहे. अंधेरी पूर्व ते दहिसर पूर्व मेट्रो-७ मार्गिका यापैकी एक आहे. या मार्गाची लांबी १८.५ किलोमीटर आहे. या मार्गावर १७ स्थानके आहेत. दुसरी मार्गिका दहिसर पश्चिम ते डी. एन. नगर, मेट्रो-२ अ आहे.

या मार्गिकेची लांबी १६.५ किलोमीटर आहे, यावर १६ स्थानके आहेत. या दोन्ही मेट्रो मार्गांची कामे प्रगतिपथावर आहेत. मेट्रो-७ करिता ६ हजार २०८ कोटी, तर मेट्रो-२ अ करिता ६ हजार ४१० कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

तीन मेट्रो प्रकल्पांची बांधकामे सुरूआहेत. डी. एन. नगर ते मंडाले मेट्रो-२ ब, वडाळा-घाटकोपर-ठाणे-कासारवडवली मेट्रो-४ आणि स्वामी समर्थनगर (अंधेरी लोखंडवाला)-विक्रोळी (जेव्हीएलआर मार्गे) मेट्रो-६; या मार्गिकांच्या कामास येत्या वर्षात सुरुवात होईल. २३.५ किमी लांबीच्या मेट्रो-२ ब मार्गिकेवर २२ स्थानके असून, प्रकल्पाची किंमत १० हजार ९८६ कोटी आहे.



**३२ किलोमीटर लांबीच्या मेट्रो-४ मार्गिकेवर ३२ स्थानके असून, या प्रकल्पाची किंमत १४ हजार ५४९ कोटी आहे. १४.५ किलोमीटर लांबीच्या मेट्रो-६ मार्गिकेवर १३ स्थानके असून, या प्रकल्पाची किंमत ५ हजार ५६६ कोटी इतकी आहे.**

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणखी चार मेट्रो मार्गिकांचे काम हाती घेणार आहे. २४ किलोमीटर लांबीच्या ठाणे-भिवंडी-कल्याण मेट्रो-५ मार्गिकेवर १७ स्थानके असतील. या प्रकल्पाची किंमत ८ हजार ४१७ कोटी आहे. ८ किलोमीटर लांबीच्या वडाळा ते जीपीओ या मेट्रो-८ प्रकल्पाची किंमत २ हजार ४०० कोटी आहे. ९ किलोमीटर लांबीच्या अंधेरी पूर्व ते वांद्रे पूर्व या मेट्रो-९ प्रकल्पाची किंमत ४ हजार ५०० कोटी आहे.**

**११ किमी लोमीटर लांबीच्या दहिसर पूर्व ते मिरा-भाईंदर मेट्रो-१० या प्रकल्पाची किंमत ३ हजार ९०८ कोटी आहे. या मेट्रो मार्गिकांमुळे २०२१ मध्ये मुंबई आणि महानगर प्रदेशातील १६० हून अधिक मेट्रो स्थानकांमधून, ४० लाखांहून अधिक प्रवासी प्रवास करतील, असा आशावाद प्राधिकरणाने व्यक्त केला आहे.**

# हिरव्या रंगासमोर कोणताही रंग टिकाव धरणार नाही

**हैदराबाद-** हैदराबादमधील एका जाहीर सभेत एमआयएमचे नेते असदुद्दीन ओवेसी यांनी आमच्या हिरव्या रंगासमोर ना नरेंद्र मोदींचा रंग टिकेल ना काँग्रेसचा. कोणत्याही रंगाचा आमच्या हिरव्या रंगासमोर टिकाव लागणार नाही, असे विधान केले आहे. हिरवा रंग आम्ही जेव्हा परिधान करु त्यावेळी सारे काही हिरवेच होईल, असेही वादग्रस्त वक्तव्य केले आहे. तुम्ही काहीही करा, पण आम्ही जेव्हा हिरवा रंग परिधान करु, त्यावेळी सगळीकडे फक्त हिरवा आणि हिरवाच रंग दिसेल, असे त्यांनी म्हटले आहे. दरम्यान, त्यांनी काँग्रेस अध्यक्ष राहुल गांधी यांच्या गुजरातमधील मंदिरांना भेट देण्याच्या सत्रावरुनही



टीका केली. गुजरातमध्ये राहुल गांधी मंदिरांना भेट देत आहेत, मग ते त्या दरम्यान मशिदीत का नाही गेले? असा सवाल उपस्थित करत राहुल गांधींनी मुस्लिमांकडे दुर्लक्षच केले, असा आरोप ओवेसी यांनी केला. राहुल गांधी यांनी शनिवारी देखील गुजरातमधील सोमनाथ मंदिराला भेट दिली. राहुल गांधी यांनी गुजरात निवडणुकीत जवळपास २७ मंदिरांना भेट दिली आहे. ओवेसी त्यापार्श्वभूमीवर बोलत होते. भाजप आणि काँग्रेसने गुजरातमध्ये मुस्लिम मतांकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले. ते असे करुन निवडणुका जिंकू शकतील, पण हे लोकशाहीच्या दृष्टीने घातक असल्याचे मत त्यांनी मांडले.

# आतातरी राज्यातील दुष्काळी भागांची यादी जाहीर करा

**नागपूर-** राज्यातील अवर्षणग्रस्त भागात दुष्काळ जाहीर करण्यास होत असलेल्या विलंबावरून भाजपचे ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांनी शुक्रवारी विधानसभेत स्वपक्षाला घरचा आहेर दिला. सरकार आतातरी राज्यातील दुष्काळी भागांची यादी जाहीर करणार आहे का? डिसेंबर उलटून जानेवारी महिना आला तरी सरकारने दुष्काळी गावांबद्दल कोणतीही घोषणा केलेली नाही. सर्वेक्षण होऊन चार-सहा महिने उलटतात तरी दुष्काळ जाहीर केला जात नाही. या काळात लोकांनी मरायचे का? सरकार त्या दृष्टीने कोणतीही व्यवस्थादेखील करत नाही, असे म्हणून माजी मंत्री एकनाथराव खडसे यांनी सरकारला सुनावले. या वेळी दुष्काळी क्षेत्र जाहीर करण्यासंबंधी केंद्र सरकारचे निकष पाळायचे ठरवले तर राज्यातील एकही गाव पात्र ठरणार नाही, अशा शब्दांत खडसेंनी सरकारला सुनावले.



केंद्र सरकारने दुष्काळी क्षेत्र ठरवण्यासाठी आखून दिलेले नवे निकष हे कठोर आणि वेगळे आहेत, ही बाब आम्हाला मान्य आहे. मात्र, तुम्ही म्हणता त्याप्रमाणे एकही गाव निकषांमध्ये बसणार नाही, ही बाब तितकीशी खरी नाही. खडसेंच्या या प्रश्नाला राज्याचे महसूल मंत्री चंद्रकांत पाटील यांनी उत्तर दिले.

चंद्रकांत पाटील म्हणाले, की आतापर्यंत गोंदियातील तीन गावांना याच निकषांनुसार दुष्काळग्रस्त जाहीर करण्यात आले आहे. मात्र, यानिमित्ताने एकनाथ खडसे पुन्हा एकदा आपल्याच सरकारचे वाभाडे काढताना दिसले. दुष्काळ घोषित करण्याबाबत केंद्र शासनाने मार्गदर्शक सूचनांमध्ये बदल केला आहे. त्यात बदल करून घेण्यासाठी मुख्यमंत्र्यांसमवेत दिल्लीला जाऊन प्रयत्न करण्यात येतील.

# आमदारपूत्र विधानसभेत शिपाईपदावर रुजू होणार

**जयपूर-** वडील राजकारणात असले तर त्यांच्या मुलांचा राजकीय प्रवेश हा निश्चित मानला जातो. पण राजस्थानमधील भाजप आमदाराचा मुलगा विधानसभेत शिपाईपदावर रुजू होणार आहे. जामवा-रामगढचे आमदार जगदीश नारायण मीणा हे भाजपचे नेते आहेत. त्यांचा मुलगा राम



किशनची १८,००८ उमेदवारांमधून शिपाईपदासाठी निवड झाली आहे. निवड समितीने मुलाखत घेतल्यानंतर रामकिशनची निवड झाली आहे. यावरून विरोधकांनी मीणा यांच्यावर 'घराणेशाही'चा आरोप केला आहे. तसेच या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केली आहे. 'भाजप सरकारने तरुणांना १५ लाख नोकऱ्या देण्याचे आश्वासन दिले होते. पण त्यातील काही हजार नोकऱ्या सत्ताधारी पक्षाचे नेते कुटुंबीय आणि नातेवाईकांना देताहेत.', असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष सचिन पायलट म्हणाले. 'नोकरभरती जाहीर होताच मुलाने अर्ज केला होता. भरतीची सर्व प्रक्रिया पार पडल्यानंतरच त्याची निवड झाली आहे.

# पत्नीच्या सुटकेसाठी पतीची दारोदार भटकंती

## ऊसतोड मुकादमाने बंधक मजूर ठेवल्याची तक्रार

**हिंगोली-** उचल घेतल्याच्या कारणावरून ऊसतोड कामगाराच्या मुकादमाने पुणे जिल्ह्यात ओलीस ठेवलेल्या पत्नीची सुटका करून घेण्यासाठी तालुक्यातील बोराळा येथील पतीकडून मदतीसाठी गेल्या चार दिवसांपासून सरकारी कार्यालयांची दारे झिजवली जात आहेत. परंतु पत्नी मुक्त न झाल्याने तो हताश झाल्याने त्याने शुक्रवारी मुख्यमंत्र्यांना निवेदनाद्वारे साकडे घातले आहे.

याबाबत येथील जिल्हाधिकारी आणि पोलिस अधीक्षकांना बोराळा येथील माधव गोमाजी वाढवे याने दिलेल्या निवेदनानुसार तो पत्नीसह २३ ऑक्टोबर रोजी इंदापूर (पुणे जिल्हा) तालुक्यातील पिंपरी (बु.) येथे ऊसतोड कामासाठी गेला होता. सेनगाव तालुक्यातील ब्राह्मणवाडा येथील दिलीप राठोड नावाच्या मुकादमाकडून त्याने या कामासाठी २५ हजार रुपयांची उचल घेतली होती. तर कामावर गेल्यावर मुकादमाकडून रोजच शिवीगाळ होत



असल्याने आणि एके दिवशी मुकादमाच्या पत्नी आणि सासूने माधवची पत्नी संगीता हिला मारहाण केल्यानंतर वाढवे दांपत्याने काम सोडण्याचा निर्णय घेतला. काम सोडायचे असेल तर २५ हजार रुपये परत कर असे मुकादमाने सांगितल्याने नोव्हेंबर महिन्यात माधव वाढवे याने ७००० रुपये आणि ७ डिसेंबर रोजी पुन्हा १० हजार रुपये परत केले आणि केलेल्या कामाचा हिशोब करण्याची विनंती मुकादम दिलीप राठोड याला केली. परंतु कामाचा हिशोब होणार नाही आणि कामाचे पैसेही मिळणार नाहीत, २५ हजारांतील उरलेले ८ हजार परत कर असे म्हणून वाढवे दांपत्याला मुकादमाने मारहाण केल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

# पाकड्यांनी ९०० वेळा केले शस्त्रसंधीचे उल्लंघन



**नवी दिल्ली-** शस्त्रसंधीचे उल्लंघन करुन पाकिस्तानने वर्षभरात ९०० वेळा जम्मू-कश्मीरमध्ये गोळीबार केला आहे. पाकड्यांनी शस्त्रसंधीचे उल्लंघन करुन ७८० वेळा नियंत्रण रेषेपलिकडून तर १२० वेळा आंतरराष्ट्रीय सीमेपलिकडून जम्मू-कश्मीरमध्ये गोळीबार केला. हिंदुस्थानच्या लष्कराने ही माहिती दिली आहे. हिंदुस्थान-पाकिस्तान दरम्यान ७७८ किमी.ची नियंत्रण रेषा (लाईन ऑफ कंट्रोल – एलओसी) आणि १९८ किमी.ची आंतरराष्ट्रीय सीमा आहे. दहशतवाद्यांना हिंदुस्थानात घुसखोरी करता यावी अथवा सीमा परिसरात तणाव राहावा यासाठी पाकिस्तान सातत्याने नियंत्रण रेषा किंवा आंतरराष्ट्रीय सीमा येथे शस्त्रसंधीचे उल्लंघन करुन गोळीबार करत असतो. वर्ष संपण्यास जेमतेम काही दिवस उरले असताना पाकिस्तानकडून शस्त्रसंधीचे उल्लंघन होण्याचे प्रमाण वाढले आहे. पाकड्यांच्या गोळीबाराला नियंत्रण रेषेवरुन हिंदुस्थानी लष्कर आणि आंतरराष्ट्रीय सीमेवरुन सीमा सुरक्षा दल (बॉर्डर सिक्युरिटी फोर्स – बीएसएफ) चोख प्रत्युत्तर देत आहे.

# जगातील या गावात आहे कपडे घालण्यावर बंदी

**नवी दिल्ली-** जगातील सर्व देशांतील राहणीमान आणि खाण्याच्या सवयींमध्ये फरक आपल्याला दिसतोच. परंतु असे म्हटले जाते ना कि एखाद्याच्या पेहराव्यावरून त्याचा देश कोणता याचा अंदाज लावला जावू शकतो. पण येथे तर तुम्हाला कोणाच्याही शरीरावर कपडे दिसणार नाहीत. पण जगात असे देखील एक गाव जिथे लोक कपडे घालतात नाही आणि नग्न राहतात, ते पण संपूर्ण आधुनिक जीवन शैलीसह. पण हे लोक नग्न का राहतात हे जाणून घेऊ या. यूकेमधील हर्टफोर्डशायरपासून बर्कट्रायवूड येथे दूर असलेल्या एका



छोटेसे गाव आहे 'स्पीलप्लाट्ज', जिथे लोक गेल्या ८५ वर्षांपासून निर्वस्त्र राहत आहेत. मग ती एक स्त्री असो किंवा पुरुष असो. विशेष गोष्ट अशी आहे की पर्यटक काही दिवस सुट्टीसाठी येथे घर भाड्याने घेऊन येथे राहतात. हे पर्यटक देखील पूर्णपणे नग्न राहतात. परंतु पर्यटक त्या गावाच्या नियमांचे पालन करतात याची काळजी घेणे आवश्यक आहे. येथे लोकांचे स्वतःचे पब, जलतरण तलाव, बंगले आणि अन्न आणि पिण्याची व्यवस्था आहे. या गावाबाबत अजूनही बऱ्याच लोकांना माहिती नाही. हे गाव १९२९मध्ये इसुल्ट रिचर्डसन यांनी शोधून काढले.

# बायकोशी भांडून नऊ वर्षे विमानतळावर राहिला

**बीजिंग-** चीनमधील वेई जिआनगुओ या माणसाने नऊ वर्षांपूर्वी बायकोबरोबर झालेल्या भांडणानंतर आपले बस्तान घरातून थेट बीजिंगच्या विमानतळावर हलवलं. अजूनही हा माणूस विमानतळावरच राहतो हे विशेष! आता विमानतळाचा एक कोपराच त्याचे घर झाले आहे. २००८ मध्ये बायकोसोबत कडाक्याचं भांडण झाल्यानंतर त्याने आपलं घर कायमचं सोडलं. विमानतळावरचा एक चांगला कोपरा निवडून तिथेच आपलं बस्तान मांडलं. इथे विजेवर चालणारी छोटीशी शेगडीही त्याने घेतली आहे. त्यामुळे तिथेच तो स्वयंपाक करतो आणि झोपतोही. त्याला दरवर्षी सरकारकडून



ठराविक रक्कमेचं अनुदान मिळतं. त्यात त्याचा खर्च आरामात भागतो. जेव्हा काही आवश्यक वस्तू आणायच्या असतील तरच तो विमानतळावरून बाहेर पडतो. अर्थातच विमातळावरील कर्मचाऱ्यांनी अनेकदा त्यांना तिथून हुसकावून लावण्याचा प्रयत्न केला; पण त्यामध्ये त्यांना अपयशच आले. विमानतळावरचा सुरक्षा बंदोबस्त कडक असला की वेई तात्पुरतं आपलं बस्तान दुसरीकडे हलवतात. पण दोन-चार दिवस झाले की पुन्हा ते विमानतळावर येतात. त्यामुळे इथल्या कर्मचाऱ्यांना देखील विमानतळावरील या नावडत्या पाहुण्याची सवय झाली आहे!

# ५ मुलांसह ६ जणांचा ८ वर्षीय बालिकेवर ५ महिन्यांपर्यंत बलात्कार

**पुणे-** पुण्यातील कोंढवा परिसरात पहिलीत शिकणाऱ्या आठ वर्षांच्या बालिकेवर मागील पाच महिन्यांपासून घराजवळील पाच अल्पवयीन मुलांसह एकूण सहा जणांनी सामूहिक बलात्कार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी पीडित मुलीच्या पालकांनी कोंढवा पोलिस ठाण्यात आरोपींविरोधात फिर्याद दिली आहे. याप्रकरणी पोलिसांनी मुस्तफे अब्दुल रज्जाक मुजावर (वय १९) या आरोपीला अटक केली आहे. इतर दहा वर्षांचे दोन, ११ वर्षांचा एक, १२ वर्षांचा एक आणि सात वर्षांचा एक अशा पाच अल्पवयीन विधिसंघर्षित बालकांना ताब्यात घेऊन त्यांची रवानगी बालसुधारगृहात केली आहे. पीडित मुलीच्या पोटात वारंवार दुखू लागल्यानंतर तसेच ती सतत



आजारी पडू लागल्याने कुटुंबीयांनी रुग्णालयात तिची वैद्यकीय तपासणी केली असता तिच्यावर अत्याचार झाल्याचे उघड झाले. सदर आरोपी हे तिच्या घराजवळ राहत असून ऑगस्ट २०१७ मध्ये त्यांनी चिमुरडीस चॉकलेटचे आमिष दाखवून तिला सोसायटीच्या टेरेसवर तसेच शेजारील नवीन बांधकामावर नेऊन मारहाण करून तिच्यावर आतापर्यंत वेळोवेळी सामूहिक बलात्कार केला.

# 'बाराखडी' आता झाली चौदाखडी, अॅ आणि ऑ या दोन स्वरांची भर

**औरंगाबाद-** महाराष्ट्र विद्या प्राधिकरणाने पहिलीपासून शिकवल्या जाणाऱ्या मराठी भाषेतील बाराखडी व वर्णमालेत बदल केला असून आता यापुढे मुलांना बाराखडीऐवजी चौदाखडी शिकवली जाणार आहे. मराठी शब्दोच्चारात मुलांना येणारी अडचण लक्षात घेऊन बाराखडीत 'अॅ' आणि 'ऑ' या दोन स्वरांची भर घालण्यात आली असून त्यामुळे मराठी भाषेची बाराखडी आता चौदाखडी झाली आहे.

इयत्ता पहिली ते पाचवीतील काही विद्यार्थ्यांना अजूनही वाचता येत नसल्याचे विविध संस्थांचे सर्वेक्षण आणि अधिकाऱ्यांनी केलेल्या पाहणीत समोर आले आहे. त्यातच मराठी भाषेतील शुद्धलेखनाचे काही नवीन नियमही तयार करण्यात आले आहेत. त्या पार्श्वभूमीवर विद्या प्राधिकरणाने विद्यार्थ्यांना तीन महिन्यांत शंभर टक्के वाचता येईल, याची हमी देणारा 'मूलभूत वाचन क्षमता विकास कृती कार्यक्रम'



तयार केला आहे.त्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण देण्यास सुरुवात झाली आहे. टप्प्या टप्प्याने संपूर्ण राज्यभरातील शिक्षकांना प्रशिक्षण देऊन सर्व शाळांत हा कार्यक्रम करण्यात येत आहे. त्याचे पहिल्या टप्प्यातील तीन दिवसांचे प्रशिक्षण प्राथमिक शिक्षकांना देण्यात आले आहे.

या मूलभूत वाचन विकास कृती कार्यक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना आदर्श वाचन करता यावे असा आहे. वाचन करताना विद्यार्थ्यांना प्रामुख्याने अर्धचंद्र, अनुस्वार, काना, मात्रा, वेलांटी असणारे काही जोडशब्द अवघड वाटतात. अशा विद्यार्थ्यांना वाचनाकडे वळवण्याची कृती या चौदाखडीमध्ये असणार आहे. सध्या एक वर्षासाठी हा कार्यक्रम राबवण्यात येत आहे.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.३-४, अमीन इंडस्ट्रियल इस्टेट, सोनावला क्रॉस रोड नं.४, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को.ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)